आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१३ मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- तुटवड्याच्या भीतीनं घरगुती वापराच्या सिलिंडरच्या मागणीत सुमारे २५ टक्के वाढ, अफवांवर विश्वास न ठेवण्याचं केंद्र सरकारचं आवाहन, पाइप गॅसच्या वापरावर भर

- महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक विधानसभेत सादर, बेकायदेशीर धर्मांतर करणाऱ्यांना ७ वर्षाच्या कारावासाची तरतूद

- पूर्वप्राथमिक शाळा प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेऊ नये यासाठी राज्य सरकार नियम करणार

**आणि**

- देशातल्या शेअर बाजारात पडझड सुरूच, सेन्सेक्स आणि निफ्टी ११ महिन्यांच्या निचांकी पातळीवर

**<><><><><><>**

देशाची एलपीजी सिलिंडरची दैनंदिन गरज ५०-५५ लाख असताना आता ही नोंदणी ७० लाखांपर्यंत गेली आहे. अफवांवर विश्वास ठेवल्यानं ही परिस्थिती उद्भवली आहे. त्यामुळं नागरिकांनी घाबरुन जाऊ नये आणि गरजेपेक्षा जास्त सिलिंडर खरेदी करु नये, असं आवाहन पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी केलं आहे.

**होल्ड सुजाता शर्मा बाइट १**

पीएनजी आणि सीएनजीचा पुरवठा सर्व ग्राहकांना सुरळीत सुरू आहे. अधिकाधिक ग्राहकांनी पीएनजीचा वापर करावा असं आवाहन त्यांनी केलं.

**होल्ड सुजाता शर्मा बाइट २**

पेट्रोल डिझेलचाही देशात कुठेही तुटवडा नसून अवैध विक्री, साठेबाजीवर कारवाई केली जात असल्याचं त्या म्हणाल्या.

होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या पूर्वेकडे ३ आणि पश्चिमेकडे २४ भारतीय जहाज आहेत, अशी माहिती बंदरं आणि नौवहन खात्याचे विशेष सचिव राजेश सिन्हा यांनी दिली. इंधन आणि वस्तूंच्या अखंड पुरवठ्यात अडथळा येऊ नये, अशी मागणी इराणकडे केल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी काल दूरध्वनीद्वारे चर्चा केली आणि चर्चेतून सर्व मुद्दे सोडवण्याच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. आखाती देशांमध्ये अडकलेल्या भारतीयांविषयीही प्रधानमंत्र्यांनी यावेळी काळजी व्यक्त केल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले.

**<><><><><><>**

आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा शेतकऱ्यांवर परिणाम होऊ नये यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज म्हणाले. आसाममधे गुवाहाटी इथं शेतकरी सन्मान निधी योजनेच्या २२ व्या हप्त्याचं वितरण करताना ते बोलत होते. सुमारे ९ कोटी ३२ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८ हजार ६४० कोटी रुपये थेट लाभ हस्तांतरण पद्धतीनं जमा होणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितलं. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना आतापर्यंत ४ लाख ९ हजार कोटींहून अधिक रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाली आहे.

**<><><><><><>**

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक २०२६ आज विधानसभेत मांडण्यात आलं. धर्मस्वातंत्र्याचं रक्षण करणं, एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतराला प्रतिबंध करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट असल्याचं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधेयक मांडताना सांगितलं….

**होल्ड - बाईट - पंकज भोयर**

जबरदस्तीनं धर्मांतर घडवून आणणाऱ्या व्यक्तीला सात वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि एक लाख रुपये दंड या शिक्षेची यात तरतूद आहे.

गेल्यावर्षी दावोस इथं झालेल्या सामंजस्य कराराची किती प्रमाणात अंमलबजावणी झाली हे सांगणारी श्वेत पत्रिका सरकार काढणार असल्याचं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत सांगितलं. यावर्षी ३१ लाख कोटींचे सामंजस्य करार दावोस इथं झाले. यात ७० ते ८० टक्के परकीय गुंतवणूकीचा समावेश आहे असं ते म्हणाले.

**<><><><><><>**

महाविद्यालयांमध्ये ५० टक्के फी माफी किंवा मुलींसाठी १०० टक्के फी माफी लागू असतानाही प्रवेशावेळी शुल्क भरण्याची सक्ती केल्याच्या तक्रारी आल्या तर संबंधित संस्थांवर कठोर कारवाई केली जाईल. यासाठी प्रत्येक महाविद्यालयात शिष्यवृत्ती प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे, असं उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत सांगितलं.

उच्च शिक्षण घेणाऱ्या अनाथ विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

अतिवृष्टीग्रस्त भागातल्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क माफीचा निर्णय सरकारनं घेतला आहे, मात्र ऑनलाईन फॉर्म भरताना परीक्षा शुल्क भरणं अनिवार्य असल्याचं कैलास पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर तांत्रिक अडचण दूर करायचा प्रयत्न केला जाईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्र्यांनी सांगितलं.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानात १२ हजार कोटी रुपयांचा प्रचंड मोठा घोटाळा सुरू असून, अधिकारी मंत्र्यांना अंधारात ठेवून सरकारी तिजोरी स्वच्छ करत असल्याचा आरोपही काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अर्थसंकल्पावरच्या चर्चेदरम्यान केला.

**<><><><><><>**

पूर्वप्राथमिक शाळेत प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेऊ नये यासाठी सरकार नियम करणार असून खासगी बालवाड्यांच्या नोंदणीसाठी एक अधिनियम प्रस्तावित असल्याचं शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. २० विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक असावा असा नियम लागू केला जाणार आहे. राज्यात १२ हजार ७३३ पूर्वप्राथमिक खासगी शाळा नोंदणीकृत आहेत, इतर शाळांनीही नोंदणी करावी, असं आवाहन भुसे यांनी केलं.

सर्व शिक्षण मंडळांच्या आणि माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा अनिवार्य असून ज्या शाळेत मराठी शिकवली जात नाही, त्या संस्थेची मान्यता रद्द केली जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

सलग तिसऱ्या दिवशी मोठी घसरण झाल्यानं देशातले दोन्ही शेअर बाजार ११ महिन्यातल्या निचांकी पातळीवर पोहोचले आहेत. सेन्सेक्स ७५ हजारांच्या खाली गेला असून निफ्टी २३ हजारांच्या खाली जाण्याच्या उंबरठ्यावर आहे. आज सेन्सेक्स १ हजार ६८० अंकांची घसरण नोंदवून ७४ हजार ४५६ अंकांवर बंद झाला. निफ्टी ४८८ अंकांची घट नोंदवून २३ हजार १५१ अंकांवर बंद झाला. कच्च्या तेलाचे वाढते दर, भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा युद्धाचा परिणाम यासारख्या कारणांमुळं शेअर बाजारात ही घसरण सुरू आहे. आखाती देशांमधलं युद्ध सुरू झाल्यापासून सेन्सेक्स पावणे ७ हजार, तर निफ्टी २ हजारांहून अधिक अंकांनी घसरले आहेत.

**<><><><><><>**

पुढच्या वर्षी नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिखर समितीची बैठक आज मुंबईत झाली. या कुंभमेळ्यात ३४ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातले पावणे ९ हजार कोटी रुपये केंद्र सरकार आणि २२ हजार रुपये राज्य सरकार देणार असल्याचं मंत्री गिरीश महाजन म्हणाले.

**होल्ड - महाजन बाइट**

**<><><><><><>**

नागपूर महानगरपालिकेचा ३१५ कोटी शिलकीचा सुधारित अर्थसंकल्प महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांनी स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांना सादर केला. सद्यस्थितीत या अर्थसंकल्पात कुठलीही करवाढ प्रस्तावित नसल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वाधिक तापमान अमरावती इथं ४२ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. कोकणात तुरळक ठिकाणी ऊष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><><>//**